# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योत योजना व आय.पी.डी.सी.(इन्फ्रा) ची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(१) २८४५३ (१३-०१-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणच्या दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योत योजना व आय.पी.डी.सी.(इन्फ्रा ३) या योजनांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार असूनही केवळ पायाभूत सुविधा दोन मधील कामे प्रलंबित असल्यामुळे सदर सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर करून त्यातील कामे सुरु करता येत नसल्याचे माहे ऑक्टोंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणची पायाभूत सुविधा २ मधील प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०६-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही. केंद्रशासनाच्या देखरेख समितीव्दारे दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेकरीता रू. २१५३.६८ कोटी व एकात्मिक ऊर्जा विकास योजनेकरीता २४०५.०८ कोटी रकमेस दिनांक ६.८.२०१५ रोजी तत्वत: मंजुरी देण्यात आली आहे. दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेच्या कांमाची निविदा प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश केंद्र शासनाकडून लवकर अपेक्षित आहे. एकात्मिका ऊर्जाविकास योजनेच्या मंडळ निहाय ४५ प्रकल्पास केंद्रशासनाकडून अद्याप मंजुरी प्राप्त झालेली नाही.पायाभूत आराखडा-२ योजनेच्या प्रलंबीत कांमाच्या व दोन्ही योजनांची कामे सुरू करण्याचा काहीही संबंध नाही.

(२) पायाभूत आराखडा योजनेतील प्रगतीचा वेग निर्धारित उद्दिष्टापेक्षा अतिशय कमी असल्यामुळे १२ कंत्राटे अंशत: रद्द करण्यात आली आहेत. रद्द केलेल्या कंत्राटातील उर्वरित कामासाठीच्या छोटया उपविभागीय स्तरावरील निविदा परिमंडळ कार्यालयामार्फत काढण्याचे निर्देशित करण्यात आले आहे. तसेच कामाचा प्रगतीचा वेग कमी असलेल्या १५ कंत्राटदारांना नोटीस टु टर्मिनेट व ३९ कंत्राटदारांना नोटीस टु करेक्ट देण्यात आल्या आहेत.तसेच कामाच्या प्रगतीच्या वेग वाढविण्याचे निर्देश सर्व कंत्राटदारांना देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गुहागर (जि.रत्नागिरी) येथील महावितरण उपकेंद्राचे रखडलेले काम सुरु करण्यात आल्याबाबत**

**(२) २८४६६ (०८-०१-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि.रत्नागिरी) शहरासाठी पायाभूत आराखडा एक अंतर्गत माहे जुलै, २०१४ मध्ये महावितरणच्या उपकेंद्राचे काम सुरु करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या आठ महिन्यांपासून सदर उपकेंद्राचे काम रखडले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर काम सुरु करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) होय हे खरे आहे.

(२) व (३) संबधित कंत्राटादाराने सदर उपकेद्रांचे काम दि. २३.०२.२०१५ पर्यंत न केल्यामुळे त्यास मार्च २०१६ पर्यत महावितरण कंपनीकडुन मुदतवाढ देण्यात आली होती. सदर उपकेंद्राला येणारी ३३ के.व्ही. वाहिनीची लांबी जास्त असल्यामुळे (१०२ कि.मी.) व कोकणातील भौगोलिक परिस्थीती व वाहिनीच्या मार्गात निर्माण होणारे अडथळे लक्षात घेता, सदर वाहिनीचा मार्ग व स्त्रोत बदलावा लागला. कामाची मुदत संपल्यामुळे संबंधित कंत्राटदाराने वाढीव मुदतीत नवीन स्त्रोतानुसार काम करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे सदर कामाची नवीन निविदा काढण्यात आली असून, पुढील प्रक्रिया सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महावितरण चांदवड विभागाचे इन्फा-२ चे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याबाबत**

**(३) २८५१० (०८-०१-२०१६). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीच्या चांदवड विभागाचे इन्फा -२ चे काम अत्यंत संथ गतीने सुरू असुन २० महिन्याच्या कालावधीत फवत १२ टक्के काम पुर्ण झालेले आहे अशी तक्रार स्थानिक लोकप्रतिनीधींनी दिनांक ८ ऑक्टोबर, २०१५ च्या दरम्यान व त्या आगोदरही तक्रार केलेली केलेली आहे हे खरे आहे काय,

(२) इन्फा -२ चे काम संथ गतीने सुरू असल्यामुळे शेकडो ट्रान्सफार्मर जळुन महावितरणचे तसेच विद्त पुरवठा वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे शेतक-यांचे करोडे रुपयांचे नुकसान झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण व शेतक-यांच्या नुकसानीस जबाबदार असणाऱ्या ठेकेदारावर महावितरण कंपनीकडुन कोणती कारवाई करण्यात आलेली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कोणती कारणे आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) अशत: खरे आहे चांदवड विभागातंर्गत शेतीपंपासाठीचे एप्रिल २०१५ ते जानेवारी २०१६ या कालावधीत ६४० इतके रोहित्र नादुरूस्त झाले होते. जानेवारी २०१६ अखेर सदर नादुरूस्त रोहित्रे बदलण्यात आली आहेत.

(३) चांदवड विभसागातील इन्फ्रा - २ चे काम निश्चित केलेल्या गतीप्रमाणे नसल्यामुळे कंत्राटाच्या अटी व शर्तीनुसार संबंधित कंत्राटदारास "नोटीस टू करेक्ट" व टेंडर रद्द करण्याबाबत "नोटीस टु टर्मिनेट" महावितरण कंपनीकडून देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वीज भारनियमनामुळे शाळांमध्ये वैदयकिय अभियांत्रिकी महाविदयालयामध्ये प्रॅक्टीकल व प्रयोगशाळेतील कामे होत नसल्याबाबत

**(४) २८५७५ (१३-०१-२०१६). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही भागात ८ ते १२ तास होणा-या वीज भारनियमनामुळे शाळांमध्ये वैदयकिय अभियांत्रिकी महाविदयालयामध्ये प्रॅक्टीकल व प्रयोगशाळेतील कामे होत नाहीत हे खरे आहे काय

(२) तसेच त्यामुळे विदयार्थ्यांचे नुकसान होत आहे हे खरे आहे काय

(३) असल्यास शैक्षणिक संस्थांना भारनियमनातून वगळण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) सध्या राज्यात वीजेच्या मागणीनुसार पुरेशी वीज उपलब्ध आहे. त्यामुळे वीजेच्या मागणी एवढा वीज पुरवठा केला जातो. काही तांत्रिक करणास्तव आणीबाणीच्या परिस्थितीत गरज पडल्यास वीज प्रणालीच्या सुरक्षिततेसाठी टप्प्याटप्याने तात्पुरत्या कालावधीसाठी भारनियमन करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील अनेक गावांमध्ये देवस्थानच्या जमिनीवर अतिक्रमण होत असल्याबाबत

**(५) २९००८ (२३-१२-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील अनेक गावांमध्ये देवस्थानच्या जमिनीवर अतिक्रमण झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश गावांमध्ये देवाच्या जमिनीचा सातबारा तेथील ग्रामस्थांच्याच नावावर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाकडून चौकशी केली आहे काय चौकशी नुसार अतिक्रमणे झालेल्या देवस्थानच्या जमिनी खाजगी मालकांकडून सोडवून देवस्थानच्या ताब्यात देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०६-२०१६)** :(१) पुणे जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये देवस्थानच्या जमिनीवर अतिक्रमण झाले असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि, हवेली तालुक्यातील मौजे खेड शिवापूर येथे गट नं.८४६/२ ही जमीन पीर कमर अली दुर्वेश व पीर गुडजी बाबा देवस्थान इनाम वर्ग-३ यांच्या नावे असून तेथे सुमारे दीडशे ते दोनशे झोपड्यांची अतिक्रमणे आहेत.
(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) प्रश्न भाग-१ च्या उत्तरास नमूद प्रकरणी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी वक्फ अधिनियम, १९९५ नुसार कार्यवाही सुरु केली आहे.

---

## वाशिम जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देयके त्वरीत देण्याबाबत

**(६) २९८६८ (२३-१२-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेतून ५ वर्षापूर्वी निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची उर्वरित रक्कम त्रुटी असल्याच्या नावाखाली दिल्या जात नसल्याने संबंधित कामगारावर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी उर्वरित देयके न दिल्यास कार्यकारी अभियंता कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देयके त्वरीत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०६-२०१६)** :(१) व (२) महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेने महावितरण कंपनीच्या वाशिम विभागीय कार्यालयाकडे याबाबत दि.१४.०९.२०१५ रोजी निवेदन सादर केले आहे.

(३) संघटनेच्या निवेदनात नमूद केलेल्या एकूण ९ कर्मचाऱ्यांना उपदान व रजा रोखीकरणाची रक्कम महावितरण कंपनीकडून अदा करण्यात आली आहे.

तसेच उपरोक्त ९ कर्मचाऱ्यांपैकी ५ कर्मचाऱ्यांना अंतिम भविष्य निर्वाह निधीची रक्कम अदा करण्यात आली असून उर्वरित ४ कर्मचाऱ्यांना सदरची रक्कम अदा करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील (ता.चंदगड) महानिर्मितीच्या तिलारी विभागात होणाऱ्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी कंपनीकडे निश्चित करण्याबाबतच**

**(७) ३२९९९ (११-०१-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील (ता.चंदगड) महानिर्मितीच्या तिलारी विभागात होणाऱ्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी कंपनीकडे निश्चित करण्याबाबतची मागणी मा.ऊर्जा मंत्री, मुख्य अभियंता (जल) महानिर्मीती कंपनी मर्या, मुंबई आदिंकडे दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर महानिर्मिती केंद्रातील कर्मचारी सुमारे २८ वर्षापासून एकाच ठिकाणी कार्यरत असल्याने ग्राहकाना अपमानस्पद वागणूक देत आहेत हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. सदर विद्युत केंद्र महानिर्मिती कंपनीचे असून, वीज उत्पादनाचे काम करते, त्यामुळे येथे प्रत्यक्षपणे ग्राहकांना संबंध येत नाही.

(३), (४), व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील कामे मोठया प्रमाणात दलाला मार्फत केली जात असल्याबाबत**

**(८) ३४५०० (०८-०१-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील कामे मोठया प्रमाणात दलाला मार्फत केली जात असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या तिस-या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने श्रीगोंदा दुय्यम निबंधक कार्यालयाचा कारभार पारदर्शक करण्यासाठी सदर कार्यालयातील असलेल्या दलालाना हटविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०६-२०१६) :**(१) व (२) होय.
(३) प्रस्तुत प्रकरणी चौकशीमध्ये वरील बाब खरी नसल्याचे तसेच कोणतीही खाजगी व्यक्ती किंवा दलाल काम करतांना आढळून आले नाहीत. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुर्डूवाडी (ता.माढा, जि.सोलापुर) येथे महावितरण कंपनीचे विभागीय कार्यालय उभारण्याबाबत**

**(९) ३५३०६ (०८-०१-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कुर्डूवाडी (ता.माढा, जि.सोलापुर) येथे विद्युत विभागीय कार्यालय उभारण्याची मागणी मा.उर्जामंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर ठिकाणी विभागीय कार्यालय निर्माण करण्याचा प्रस्ताव महावितरण कंपनीकडे विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) बार्शी विभागांतर्गत असलेला करमाळा, टेंभुर्णी, कुर्डूवाडी, जेऊर या गावांसाठी नवीन उपविभाग तयार करण्यासाठी प्रचलित मानकांनुसार आवश्यक ग्राहक संख्या कमी पडत असल्याने नवीन कुर्डुवाडी उपविभाग निर्माण करणे सद्यस्थितीत शक्य नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विद्युत मंडळ व वीज कंपन्यात कामगार १० ते १५ वर्षापासून ठेकेदार, अभियंता तांत्रिक कामगारांमार्फत कार्यरत असल्याबाबत**

**(१०) ३६४४४ (२३-१२-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्युत मंडळ व नंतरच्या तीन वीज कंपन्यांत काम करणारे एकूण ३२ हजार कंत्राटी (आऊट सोर्सिंग) कामगार गेल्या १० ते १५ वर्षापासून ठेकेदार, अभियंता किंवा तांत्रिक कामगारांमार्फत कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तीन्ही वीज कंपन्यांचे व्यवस्थापन यांनी ३२ हजार कामगार आमचे नाहीत व याची आम्ही कोणतीही जाबदारी घेण्यास बांधील नाही, असे सांगून जबाबदारी झटकली हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कामगारांना बेवारस असल्याची भावना मनात येत असल्याने वीज कंपन्यांतील संघटनांच्या कृती समितीने वीज कंपन्यांच्या मुख्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यास सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू ३२ हजार कंत्राट कामगारांना कायम करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०३-०६-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) वीज क्षेत्रातील संघटनांच्या संयुक्त कृती समितीने दि.०१.०९.२०१५ पासून विविध मागण्यांकरीता मुख्य कार्यालय, प्रकाशगड येथे धरणे आंदोलन केले होते ही बाब खरी आहे.
(४) या संदर्भात कार्यकारी संचालक (मा.सं.), महानिर्मिती यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्हयातील उदरनिर्वाहपोटी विटभट्टीचा छोटेखाणी व्यवसाय करणाऱ्या शेतकरी व बेराजगार कुटुंबीयाकडून लघु व्यवसायापोटी रॉयल्टी व महसुलात सुट देण्याबाबत

**(११) ३८४५८ (११-०१-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हयातील उदरनिर्वाहपोटी विटभट्टी व छोटेखाणी व्यवसाय करणाऱ्या शेतकरी व बेराजगार कुटुंबीयाकडून लघु व्यवसायापोटी रॉयल्टी व महसुलात सुट देण्याकरिता जिल्हाधिकारी अकोला यांचेकडे वारंवार निवेदनाद्वारे शासनाकडे मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास जिल्हयातील सदर छोटेखाणी विटभट्टी व्यवसायीकांचे अतीवृष्टी व पुर सारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचा मोबदला मागणी करुन सुध्दा अदयापर्पत दिलेला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास सदर छोट्या व्यावसायीकांच्या उपरोक्त सवलतीच्या मागणीपोटी शासन सहानुभुतीपुर्वक विचार करणार आहे काय,

(४) असल्यास, सदर लघु व्यावसायीकांना सवलत व संरक्षण देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०५-२०१६) :**(१) चोहोटटा बाजार शेतकरी वीज उत्पादक संघ यांनी मा.पालकमंत्री अकोला यांच्याकडे मातीच्या स्वामीत्वधनाची रक्कम पूर्ववत करणे व पर्यावरणविषयक अटी शिथील करण्याबाबत माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे.
(२) अतिवृष्टी व पुर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे विटभट्टी व्यावसायीकांना नुकसानभरपाई देण्याची नियमात तरतुद नाही.
(३) व (४) शासनाने कुंभार समाजातील कुटुंबांना त्यांच्या पारंपारिक व्यवसायासाठी प्रति कुटुंब दरवर्षी ५०० ब्रासपर्यंतच्या मातीवर स्वामित्वधनावी सवलत दिली आहे. मातीवरील स्वामरत्वधनाच्या दरात ५ वर्षानंतर सुधारणा करण्यात आली असल्याने, सदर दर पूर्ववत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ईशान्य महामुंबईस्थित मानखुर्द-शिवाजी नगर मुंबई उपनगर जिल्हास्थित प्रचंड वीज दरवाढीमुळे रहिवाशांना आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याबाबत**

**(१२) ३९८२० (२०-०४-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानखुर्द-शिवाजी नगर मुंबई उपनगरात झालेल्या वीज दरवाढीमुळे रहिवाशांना आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याने त्याबाबत उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी, रहिवाशी संघांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री (उर्जा),मा. राज्यमंत्री (उर्जा), प्रधान सचिव (उर्जा), मुख्य अभियंता रीलायन्स एनर्जी अभिकर्तायांच्याकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कालावधीत करण्यात आलेल्या सूचनांच्या कार्यपुर्तीबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणातील चिरे, वाळू, खडी व्यवसायिकांच्या रॉयल्टीमध्ये**
**५० टक्के कपात करण्याच्या घोषणेबाबत**

**(१३) ४०६७० (२०-०४-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील चिरे, वाळू, खडी व्यवसायिकांच्या रॉयल्टीमध्ये ५० टक्के कपात करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान नागपूर अधिवेशनात केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घोषणेची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०५-२०१६) :**(१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य खाण व क्रशर उद्योजक महासंघ व इतर जिल्हा संघांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने, मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २३/१२/२०१५ रोजी विधानसभेत स्वामित्वधनाच्या दरवाढीबाबत पुनर्विचार करुन निर्णय होईपर्यंत, दर वाढीपैकी ५० टक्के दरवाढ स्थगित करण्यात येईल असे निवेदन केले आहे.

उक्त निवेदनाच्या अनुषंगाने दगड व जांभा दगड या गौण खनिजांवरील स्वामित्वधनाच्या दरात शासनाने दिनांक ११/०५/२०१५ च्या अधिसूचनेन्वये केलेल्या वाढीपैकी ५०% दरवाढ पुढील आदेशापावेतो स्थगित करण्यात आलेली आहे.

---

**विटभट्टी कामगारांना रोजगार व विटभट्टी व्यवसाय पूर्ववत चालू**
**राहण्याच्या दृष्टीने जाचक अटी शिथिल करणेबाबत**

**(१४) ४०८८६ (२०-०४-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या जाचक अटी व बांधकामासाठी लागणाऱ्या विटांची कमी होत चाललेली मागणी यामुळे रायगड जिल्ह्यातील अनेक विटभट्टी व्यावसायिक कामगारांवर विटभट्टी व्यवसाय बंद होत असल्यामुळे उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे जानेवारी २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले ,हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, आर.सी.सी ब्लॉक वापरल्याने बांधकाम व प्लॅस्टरचा खर्च कमी होत असल्याने बांधकाम व्यावसायिक आर.सी.सी ब्लॉकचा वापर करीत असल्यामुळे विटभट्टी व्यावसायिकांच्या विटांची मागणी कमी होत चालली आहे,हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, विटभट्टी कामगारांना रोजगार व विटभट्टी व्यवसाय पूर्ववत चालू राहण्याच्या दृष्टीने जाचक अटी शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०७-२०१६) :**(१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) येथील महावितरणचे सहाय्यक अभियंत्यास लाच घेताना पकडल्याबाबत**

**(१५) ४१२२७ (२०-०४-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) येथील महावितरणचे सहाय्यक अभियंता, राकेशसिंह मेहता यास वीज ठेकेदाराकडून १५ हजार रुपायाची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सिंधुदुर्ग पथकाने दिनांक ६.१.२०१५ रोजी वा त्या सुमारास रंगेहाथ पकडल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले त्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी महावितरण कंपनीकडून फौजदारी प्रकरणातील, तसेच विभागीय चौकशी संदर्भातील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डगाव सावताळ (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथे शेत जमिनीचे खातेवाटप करुन "आठ-अ"चा उतारा देण्यासाठी लाच घेताना अटक केल्याबाबत**

**(१६) ४१५९६ (२०-०४-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडगाव सावताळ (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथे शेत जमिनीचे खातेवाटप करुन "आठ-अ"चा उतारा देण्यासाठी २० हजार रुपयांची लाच घेताना तलाठी चंद्रकांत साबळे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक २४.डिसेंबर.२०१५ रोजी वा त्यासुमारास अटक करण्यात आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित तलाठयाची विभागीय चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०६-२०१६) :**(१), (२) व (३) तक्रारदार श्री.अशोक बाळु कोळपे, रा.गाजदीपुर, ता.पारनेर यांच्याकडून त्यांच्या वडिलांच्या नावे असलेल्या गट नं. ६४ मधील क्षेत्राची खामेफोड करुन गाव नमुना नंबर ८अ चा उतारा देण्यासाठी लाच स्वीकारल्याच्या आरोपावरुन श्री. चंद्रहास ऊर्फ चंद्रकांत बाबासाहेब साबळे, तत्कालीन तलाठी वडगांव सावताळ, ता.पारनेर, जि.अहमदनगर यांना दि.२४.१२.२०१५ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरोकडून अटक करण्यात आली. तद्नुषंगाने, श्री.साबळे यांचयाविफध्द लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) अनुसार पारनेर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर प्रकरणी त्यांच्याविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यास दिनांक २५.२.२०१६ रोजी सक्षम प्राधिकाऱ्याकडून मान्यता देण्यात आलेली आहे. श्री.साबळे यांना उपविभागीय अधिकारी, श्रीगोंदा पारनेर भाग, जि.अहमदनगर यांनी दिनांक २८.१२.२०१५ च्या आदेशान्वये निलंबित केले असून त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अवैधपणे वाळू उत्खनन केल्याबाबत रायगड जिल्यात नोंदविलेल्या**
**व दंडात्मक कारवाई केलेल्या गुन्ह्याबाबत**

**(१७) ४१६६६ (२०-०४-२०१६). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यात अवैधपणे वाळू उत्खनन केल्याबाबत अनेक वाळू माफियांना रंगेहात पकडूनही त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैधपणे उत्खनन करणाऱ्या वाळू माफियांविरुद्ध गुन्हे दाखल न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०७-२०१६) :**(१), (२) व (३) रायगड जिल्ह्यात गोणखनिजाच्या अवैध उतखनन/वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी जिल्हास्तरार तसेच तालुकास्तरावर भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. तसेच मोक्याच्या ठिकाणी महसूल विभाग, परिवहन विभाग व पोलीस विभागाचे संयुक्त तपासणी नाके कार्यान्वीत करण्यात आले आहेत. रायगड जिल्ह्यात दिनांक १.४.२०१५ ते दिनांक ३१/३/२०१६ या कालावधीत वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीची एकूण ६१० प्रकरणे निदर्शनास आली असून, सदर प्रकरणात एकूण रु.१,६३,०३,७९९/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. तसेच २९ प्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले असून, ४३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्हयात स्टॅम्प व बॉण्ड पेपर केंद्र सुरु करण्याबाबत**

**(१८) ४१६७७ (२०-०४-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील कोर्ट फी स्टॅम्प आणि स्टॅम्प पेपरचा गेल्या काही महिन्यापासून तुटवडा असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, डहाणू तालुक्यातील ८५ ग्रामपंचायती, १७४ महसूल गावे असून येथील हजारो लोकांना दैनंदीन शासकीय कामासाठी स्टॅम्प पेपरचा पुरवठा अत्यंत अपुरा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्हयात तसेच डहाणू तालुक्यात स्टॅम्प व बॉण्ड पेपर केंद्र सुरु करण्याबाबत स्थानिक आदिवासी नागरीकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने स्टॅम्प व बॉण्ड पेपर केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०६-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

प्राप्त अहवालानुसार डहाणू तालुक्यातील मुद्रांक विक्रेते व जिल्हा कोषागार कार्यालय, पालघर यांचेकडे मुद्रांकाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

(३), (४) व (५) होय.

बनावट मुद्रांक घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर खाजगी व्यक्तींना मुद्रांक विक्री परवाना देण्यास शासनाने दिनांक २४/९/२०१० च्या शासन निर्णयान्वये कायमस्वरुपी बंद केले आहे.

नागरिकांना २४ x ७ ई-पेमेन्टद्वारे शासनाच्या ग्रास प्रणालीमार्फत मुद्रांक शुल्क व नोंदणी फी चा भरणा करण्याची सुविधा सन २०११ पासून उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मुद्रांक शुल्क व नोंदणी फी च्या एकूण जमा रकमेतील ९७% इतकी आहे. सदर प्रणाली अधिक सुरक्षित व पारदर्शक असून ती राज्य शासनाच्या मालकीची आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील वाळू व खनिज उत्खनन केलेल्या**
**व्यक्तीविरुद्ध करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत**

**(१९) ४१६८३ (२०-०४-२०१६). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिह्यात अनेक ठिकाणी वाळू व्यावसायिक व खानमालकांनी वाळूचे उत्खनन करण्याचा लिलाव असतानाही संबधित व्यक्तीकडून महसूल स्वामित्व धनाची रक्कम भरण्याबाबत नोटीसा बजावूनही माहे जानेवारी २०१६ पर्यत रक्कम भरण्यात आली  नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नोटीस बाजावल्यानुसार किती खातेदारांनी स्वामीत्व धनापोटी (रॉयालटी) रक्कम भरणा केली आहे,
(३) असल्यास, स्वामित्व धरणाची रक्कम वसूल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०७-२०१६) :**(१), (२) व (३) रायगड जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन, वाहतुक व रेती साठ्याबाबत एकूण १४४ व्यावसायिकांना एकूण रु.४,२७,९८,९८३/- इतक्या रकमेच्या स्वामित्वधन व दंडाच्या वसुलीबाबत नोटीसा देण्यात आल्या होत्या. त्यापैकी एकूण १३० व्यावसायिकांकडून एकूण रुपये २९,९९,४४१/- इतकी स्वामित्वधन व दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरित १४ व्यावसायिकांनी स्वामित्वधन व दंडाची रक्कम शासनजमा केलेली नसल्याने त्यांच्या विरुध्द जमीन महसूलाची थकबाकी म्हणून येणे रक्कम सक्तीच्या उपायांनी वसूल करण्याची कारवाई चालू आहे. तसे, जिल्हाधिकारी रायगड यांनी संबंधितांच्या स्थावन मिळकतीच्या गाव नमुना नंबर ७/१२ वर बोजा चढविण्याबाबत निर्देश दिले आहेत.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**राज्यात प्रशासकीय सोयीसाठी व नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी**
**२२ जिल्हे व ४९ तालुके निर्माण करण्याबाबत**

**(२०) ४१८५७ (२०-०४-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्रशासकीय सोयीसाठी व नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी २२ जिल्हे व ४९ तालुके निर्माण करण्यासाठी मा.अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने शासनास अहवाल सादर केला आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पूढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास राज्यातील जिल्ह्यांचे विभाजन/पुनर्रचनेबाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा करण्यात आला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-०६-२०१६) :**(१),(२) व (३) राज्यस्तरावर जिल्हा विभाजनाबाबत निकष ठरविण्याकरीता शासनाने अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (महसुल) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित केली असून सदर समितीस आपला अहवाल सादर करण्यास दि. ३१.०५.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर निश्चित केल्या जाणा-या निकषानुसार जिल्हयांचे विभाजन/पुनर्रचनबाबत उचित निर्णय घेण्याचे संकलित आहे.

तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करणेबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असुन त्यावर सर्व विभागीय आयुक्त यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत. सर्व विभागीय आयुक्तांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तालुका विभाजनांचे निकष निश्चित करून नवीन तालुका निर्मितीबाबत प्रकरणपरत्वे उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील वीज कंपन्यांमधील भ्रष्टाचार रोखण्यासाठी वीज दक्षता आयोग स्थापन करण्याचा प्रस्तावाबाबत

**(२१) ४१८८२ (२०-०४-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वीज कंपन्यांमधील चाललेला गैरव्यवहार रोखण्यासाठी शासनाला तांत्रिक मार्गदर्शक करण्यासाठी वीज दक्षता आयोग स्थापन करण्याचा प्रस्ताव तयार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी तयार केलेल्या प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०७-२०१६) :**(१) हे अशत: खरे आहे. महाराष्ट्र राज्य वीज मंडळ सूत्रधारी कंपनीने अधीनस्थ असलेल्या महावितरण, महानिर्मिती व महापारेषण या तीन कंपन्यातील कर्मचाऱ्यांच्या कामकाजासंदर्भातील दक्षता संदर्भातील तक्रारींची चौकशी करण्यासाठी “वीज दक्षता समिती” स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनीच्या अधिनस्थ “वीज दक्षता समिती” ही त्रिसदस्यीय समिती असून ती तिन्ही कंपन्यांच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या कामाकजासंदर्भातील दक्षता दृष्टीकोनातून असलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करावयाच्या अन्वेषणाच्या कामकाजाबाबत पर्यवेक्षण करणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हा प्रशासनाच्या आदेशानुसार वाळूची तस्करी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२२) ४२०१३ (२०-०४-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा प्रशासनाच्या आदेशानुसार वाळूची तस्करी करणाऱ्यांना चाप लावण्यासाठी आरटीओनी पोलीसांना सोबत घेतले होते परंतू त्यांच्यात समन्वय नसल्यामुळे त्यातील एक ट्रक पळवून नेल्याची माहिती माहे १२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिसरात पोलीस, आरटीओ व महसूल विभागाच्या आधिकाऱ्यांन मध्ये समन्वय नसल्याने वारंवार वाळू तस्कराचे ट्रक पळून जात असल्याप्रकरणी शासनाने संबंधित असलेल्या विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०५-२०१६)** :(१) व (२) औरंगाबाद जिल्ह्यात वाळूच्या अवैध उत्खनन/वाहतूकीस आळा घालण्यासाठी महसूल, परिवहन व पोलीस विभागाच्या संयुक्त तपासणीसाठी पथके स्थापन करुन ५ तपासणी नाक्यांवर दिनांक ०७/०१/२०१६ ते दिनांक १५/०१/२०१६ या कालावधीत तपासणी करण्याचे ठरविण्यात आले होते. त्याअनुषंगाने तपासणी नाका क्रमांक ५ येथे दिनांक १०/०१/२०१६ रोजीच्या तपासणीवेळी पोलीस कर्मचारी उपस्थित नसताना वाळू वाहतूक करणारा १ ट्रक पकडला होता. सदर वाहनाचे वजन करण्यासाठी नेत असताना, ट्रक मधील कर्मचाऱ्यास सदर वाहनातून जबरदस्तीने उतरवून ट्रक पळवून नेण्यात आला. त्याविरुध्द संबंधितांविरुध्द पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने रेडीरेकनरच्या दरात अंदाजे ५ ते १३ टक्के वाढ करण्यात येणार असल्याबाबत**

**(२३) ४२०५७ (२०-०४-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने रेडीरेकनरच्या दरात अंदाजे ५ ते १३ टक्के वाढ करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची दरवाढ ही नियमबाह्य असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यात आली आहे काय वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२३-०६-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

नोदणी विभागाकडून दिनांक १/४/२०१६ रोजी वार्षिक मूल्य दर तक्ते निर्गमित केले असून राज्यात सरासरी ७० % माफक दरवाढ करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरगाबाद शहराचा वाढता विस्तार लक्षात घेवून सद्याच्या तहसील कार्यालयाचे विभाजन करण्याबाबत**

**(२४) ४२२३८ (२०-०४-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंरगाबाद शहराचा वाढता विस्तार लक्षात घेवून तहसील कार्यालयाचे विभाजन करुन आणखी एक नवीन तहसील कार्यालय सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे जानेवारी २०१६ रोजी च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तहसील कार्यालय केव्हापासून सुरु करण्यात येणार आहे वा येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-०६-२०१६) :**(१) औरगांबाद जिल्हयातील विदयमान औरंगाबाद तहसिल कार्यालयाकडे असलेले मोठया प्रमाणावरील कामकाज व तुलनेने अपूरी पडणारी अधिकारी/कर्मचारी संख्या विचारात घेवून औरंगाबाद तहसिल कार्यालयाचे बळकटीकरण करण्याच्या दृष्टीने औरंगाबाद तालुक्यात अपर तहसिलदार, औरंगाबाद यांचे कार्यालय स्थापन करण्यास शासनाने शासन निर्णय दि. ३१.१२.२०१५ अन्वये मंजुरी दिली आहे.

(२) अपर तहसिलदार, औरगांबाद यांचे कार्यालय दि. ९.०२.२०१६ पासून सुरू करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कागल (जि. कोल्हापूर) येथील भूमी अभिलेख कार्यालयाला सोसी सुविध पुरविण्याबाबत**

**(२५) ४३२१४ (२०-०४-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कागल (जि. कोल्हापूर) येथील भूमी अभिलेख कार्यालयाला आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या असताना विविध संवर्गातील १३ पदे रिक्त असल्याने अपुऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांमुळे अनेक विभागातील कामे बंद झाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरिष्ठ कार्यालयाने कागल कार्यालयास महसूली वसूलीचे ५ कोटी रुपयाचे टारगेट. दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास प्रश्न भाग (१) मध्ये उल्लेखित अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येतआहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०६-२०१६) :**(१), (२) व (३) उप अधीक्षक भूमी अभिलेख, कागल या कार्यालयामध्ये एकूण २७ पदे मंजूर असून, वर्ग-२ चे १ पद वर्ग३ ची ६ पदे वर्ग-४ ची ३ पदे अशी एकूण १० पदे सद्यस्थितीत रिक्त आहेत.

उप अधीक्षक भूमी अभिलेख, कागल या पदावरील अधिकारी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे हे पद रिक्त झाले आहे. सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार नगर भूमापन अधिकारी, कोल्हापूर यांचेकडे देण्यात आलेला आहे. तसेच कार्यालयातील रिक्त असणाऱ्या पदांचा कार्यभार अन्य कर्मचारी अतिरिक्तपणे सोपविण्यात येवून विभागातील कामांचा निपटारा करण्यात येत आहे.

सन २०१५-२०१६ साठी उप अधीक्षक भूमी अभिलेख, कागल कार्यालयास रु.४६.०० लाख वसूलीचे उद्दीष्ट देण्यात आले होते.

सरळसेवा भरतीप्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. सन २०१६ च्या नियतकालीक बदलीमध्ये सदर कार्यालयातील रिक्त पदे भरण्याची संकल्पीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र वितरण कंपनीचे विभाजन करण्याऐवजी राज्यातील**
**१६ झोन कार्यालयाना सक्षम करण्याची केलेली मागणी**

**(२६) ४३४९९ (२०-०४-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र वितरण कंपनीचे विभाजन करण्याऐवजी राज्यातील १६ झोन कार्यालयाना सक्षम करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाच आयोजन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीनुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनान कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०७-२०१६)** :(१) महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेने विविध मागण्यांसाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये आंदोलन करण्याबाबत महावितरण कंपनीस निवेदन दिले होते. सदर निवेदनामध्ये महावितरण कंपनीचे क्षेत्रिय पातळीवर पाच विभागात विभाजन करु नये ही व इतर मागण्या होत्या.

(२) व (३) या संदर्भात महावितरण कंपनीच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे वेणेगाव (ता.जि.सातारा) येथील परवान्यातील अटीशर्तीचा भंग करुन वाळूचा उपसा होत असल्याबाबत**

**(२७) ४३६४८ (२०-०४-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वेणेगाव (ता.जि.सातारा) येथे वाळू परवान्यातील अटी आणि शर्तीचा भंग करुन वाळू उपसा करीत असल्याप्रकरणी तहसिलदार यांनी दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी धाड टाकली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टाकलेल्या धाडीत काय आढळून आले व त्यानुसार सदर वाळू उपसा करणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०५-२०१६)** :(१) व (२) जिल्हास्तरीय भरारी पथकाने मौजे वेणेगांव, ता.सातारा येथील २ वाळूगटांची तपासणी केली असता, तेथे विनापरवानगी सक्शनपंपाद्वारे वाळू उत्खनन करण्यात येत असल्याचे आढळून आले. त्यानुसार सदर ठिकाणी असलेले सक्शन पंप, पोकलेन मशीन, ट्रक्स व टॅक्टर जप्त करुन, दोनही लिलावधारकांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे व कल्याण येथील खाडीमध्ये पारंपरिक पध्दतीने डुबीने
रेती काढण्यास परवानगी देण्याबाबत**

**(२८) ४४१५५ (२०-०४-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व कल्याण येथील खाडीमध्ये पारंपरिक पध्दतीने डुबीने रेती काढण्यास परवानगी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, याप्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०७-२०१६) :**(१), (२), (३) व (४) प्रश्नाधीन भागात हातपाटी व डुबी पध्दतीने वाळू काढण्याची परवानगी देण्याची मागणी शासनाकडे प्राप्त झाली होती. तथापि, याकामी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्यामार्फत करण्यात आलेल्या पाहणीत संबंधीत भागात कोठेही पाण्याची खोली ३ मीटरपेक्षा कमी न आढळल्याने, हातपाटी व डुबी पध्दतीने वाळू उत्खननाची परवानगी देणे अनुज्ञेय नसल्याने, मागणी मान्य करण्यात आली नाही.

---

**मच्छिमार नौकांसाठी प्रोत्साहन तसेच आगीत जळून भस्मसात झालेल्या
ट्रॉलसर्व मच्छिमार नौकांसाठी नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(२९) ४४५८३ (२०-०४-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मच्छिमार नौकांसाठी ९० टक्क्यांपर्यंत शासकीय अनुदान व नव्या नौकांसाठी प्रोत्साहन तसेच आगीत जळून भस्मसात झालेल्या ट्रॉलसर्व मच्छिमार नौकांसाठी नुकसान भरपाई देण्याची योजना शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन असलेल्या योजनेवर शासनाने निर्णय घेतला आहे काय व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०७-२०१६) :**(१) नाही.

(२) सदन बाबतीत शासन स्तरावर निर्णय घेण्यात आलेला नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रशासकीय सेवेसाठी उदगीर हा नवीन जिल्हा करण्याबाबत**

**(३०) ४४७४२ (२०-०४-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रशासकीय सेवेसाठी २२ नवीन जिल्हे निर्मिती बरोबर उदगीर हा नवीन जिल्हा करण्यात येणार असल्याचे ऑगस्ट, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २४ जून, २०१४ च्या शासन निर्णयान्वये अप्पर मुख्य सचिव /प्रधान सचिव (महसुल) यांचे अध्यक्षेतखाली समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, समितीने डिसेंबर, २०१५ दरम्यान सादर केलेल्या अहवालानुसार उदगीर जिल्हा निर्मिर्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-०६-२०१६) :**(१) जिल्हा विभाजन व तालुका निर्मितीबाबत विविध लोकप्रतिनिधी/संघटना/व्यक्ती इ. कडून वेळोवेळी शासनाकडे मागण्या निवेदने प्राप्त झाली आहेत.

(२) व (३) राज्यस्तरावर जिल्हा विभाजनाबाबत निकष ठरविण्याकरीता शासनाने दि. २४.०६.२०१४ च्या शा. नि. अन्वये अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित केली असून समितीस आपला अहवाल सादर करण्यास दि. ३१.०५.२०१६ पर्यत मुदतवाढ देण्यात आली आहे.सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर निश्चित केल्या जाणा-या निकषानुसार जिल्हयांचे विभाजन/पुनर्रचनेबाबत उचित निर्णय घेण्याचे संकल्पित असुन त्यानुसार नवीन उदगीर जिल्हा निर्मितीच्या संदर्भातही उचित निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आदिवासींच्या जमिनी खुल्या करण्याचा घेतलेला निर्णय**

**(३१) ४५२४३ (२०-०४-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासींच्या जमिनी खुल्या करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्याच सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाला राज्यभरातील लोकप्रतिनिधीनी विरोध दर्शविला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-०७-२०१६) :**(१), (२) व (३) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम-३६ अ अन्वये आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींना बिनशेती प्रयोजनासाठी हस्तांतरणास शासनाच्या पूर्व परवानगीने देण्याची तरतूद आहे. तसेच, महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करणे अधिनियम, १९७४ आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम-३६ व ३६-अ मधील तरतुदीनुसार नियमबाह्यरित्या हस्तांतरीत झालेल्या आदिवासींच्या जमिनी परत करण्याची तरतूद आहे.

महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार समितीच्या ४८ व्या बैकीमध्ये आदिवासींच्या जमिनीचे बिगर आदिवसींना होणारे हस्तांतरण रोखण्यासाठी इतर राज्यात असलेल्या कायद्याची तपासणी करुन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये योग्य तो बदल करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन समितीच्या अहवालांवर निर्णय होईपर्यंत नवीन हस्तांतराचा प्रस्ताव नोंदवू नये या स्वरुपाचा निर्णय घेण्यात आला होता. त्याअनुषंगाने कलम ३६ अ अन्वये प्रकरणपरत्वे तशी परवानगी देण्याचे शासनास अधिकार असताना देखील आदिवासींच्या जमीन विक्री परवानगी देण्याबाबतची प्रकरणे काहीकाळ अनिर्णित ठेवण्यात आली होती. त्यामुळे काही प्रकरणी संबंधितांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करुन अशी प्रकरणे अंतिमत निर्णयित करण्यास शासनास निर्देश देण्याबाबत मा.उच्च न्यायालयास विनंती केली होती. त्याअनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने विविध याचिकांमध्ये अशा प्रकरणी विहित मुदतीत निर्णय घेण्यास शासनास निर्देश दिले असल्याने त्याअनुषंगाने अशी प्रकरणे निर्णयित करणेत येत आहेत.

दरम्यानच्या कालावधीमध्ये आदिवासींच्या जमिनींच्या हस्तांतरणास परवानगी देण्याबाबत तसेच परवानगी न देण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी तसेच इतरांची काही निवेदने शासनाकडे प्राप्त झालेली आहेत.

(४) वर नमूद शासननियुक्त समितीने आपला अहवाल आदिवासी विकास विभागाकडे सादर केला असून त्याबाबत आदिवासी विकास विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### सिंधुदुर्ग जिल्हयातील मोचेमाड खाडीतील लिलावास बंदी करुन वेंगुर्ला तालुक्यावर अन्याय केल्याबाबत

**(३२) ४६१२८ (२०-०४-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयात वाळू लिलाव बंदीचा आदेश उठवण्यात आला असून लिलाव जाहीर झाला असताना मोचेमाड खाडीतील लिलावास बंदी करुन वेंगुर्ला तालुक्यावर अन्याय केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या खाडीत गेल्या ३ वर्षापासून शासनाने वाळू उत्खननास परवानगी न दिल्याने पारंपारित, हातपाटी द्वारे वाळू उत्खनन करणाऱ्या व्यावसायिकांवर व मच्छीमारांवर उपासमारीची वेळी आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी लिलाव प्रक्रिया जाहीर होईपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू खाडीतील वाळू उत्खननास परवानगी नाकरण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, या खाडीतील वाळू उत्खनास शासन केव्हापर्यंत परवानगी देणार आहे वा देण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०७-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) मोचेमाड खाडीतील वाळूचा लिलाव जहिर करण्याबाबत श्री.देव वेतोबा वाळू व्यवसायीक असोसिएशन, आरवली टाक, ता.वेंगुर्ले यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग येथे दिनांक २५/०१/२०१६ रोजी एका दिवसाचे उपोषण केले होते.

सागरी किनारपट्टी विनियमन (CRZ) क्षेत्रामध्ये वाळूचे उत्खनन फक्त नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी करता येते. त्यासाठी शासन निर्णय दि. २१/०५/२०१५ अन्वये कोकण सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातील नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू अत्खननाकरीता धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने सर्वेक्षण करुन याबाबतचा प्रस्ताव तयार करावयाचा आहे. मोचेमाड खाडीचा भौगोलिकदृष्ट्या विचार करता या खडीमध्ये मालवाहतूक करणे शक्य नसल्याने, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून या खाडीमधील वाळू उत्खनन प्रस्तावित करण्यात आले नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यातल महाऔष्णिक वीज केंद्रात परप्रातीयं कामगारांचे पोलिस व्हेरीफिकेशन न करताच विज केंद्रात सामावुन घेतल्या जात असल्याबाबत**

**(३३) ४६३४० (२०-०४-२०१६). अ‍ॅड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील महाऔष्णिक वीज केंद्रात परप्रातीय कामगारांचे पोलिसानकडून पडताळणी न करताच विज केंद्रात सामावुन घेतल्या जात असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज केंद्रातील वाढीव संच क्रमांक ०८ व ९ मध्ये बिजीआर कंपनी कडून कामगारांचे पोलीसानकडून पडताळणी न करताच झारखंड येथील कामगाराचा भरणा करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्रातील कामगारांना पोलीसानकडून पडताळणी विना कामापासून वंचीत ठेवले जात आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर वीज केंद्रातील कामगार भरतीबाबत शासनाकडून चौकशी करण्यात आलेली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०७-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. चंद्रपूर प्रकल्पातील संच क्र.८ व ९ मध्ये बिजीआर कंपनीकडून सद्यस्थितीत एकूण ७७४ कामगार कामावर आहेत. त्यापैकी ३७४ कामगारांचे पोलीस पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त असून १८० कामगारांची पोलीस पडताळणी प्रक्रिया सुरु आहे. या प्रकल्पामध्ये २२ कामगार झारखंड येथील असून, त्यांची माहिती स्थानिक पोलिस स्टेशनला देण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपुर जिल्हयात कोरपना तालुक्यातील गडचांदूर शहराला तालुका घोषीत करण्याबाबत केलेले आंदोलन**

**(३४) ४६३७८ (२०-०४-२०१६). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपुर जिल्हयात कोरपना तालुक्यातील गडचांदूर शहराला तालुका घोषीत करण्यासाठी गडचांदुर रहिवाशीनकडून दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास जनआंदोलन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरपना तालुक्याचे विभाजन करुन गडचांदूर निर्मिती करण्यासाठी तत्कालीन उपविभागीय अधिकारी (महसूल), राजुरा यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे प्रस्ताव सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-०६-२०१६)** :(१) होय
(२) तत्कालीन उपविभागीय अधिकारी (महसूल), राजुरा यांनी दि. ३१ डिसेंबर २०१५ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी , चंद्रपूर यांना प्रस्ताव सादर केलेला असून जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी सदर विभागीय आयुक्त, नागपूर यांना सादर केलेला आहे.
(३) तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालावर सर्व विभागीय आयुक्तांचे सविस्तर अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर तालुका निर्मिती/विभाजनाचे निकष निश्चित करण्याचे संकल्पित आहे. तदनंतर चंद्रपुर जिल्हयातील कोरपना तालुका निर्मितीबाबतच्या प्रस्तवा संदर्भात प्रकरणपरत्वे उचित निर्णय घेण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**घाटंजी (जि.यवतमाळ) येथील टॉवर विरोधी शेतकरी समितीने टावरग्रस्त जमिनीचा मोबदला मिळण्याकरिता**

**(३५) ४६५७४ (२०-०४-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटंजी (जि.यवतमाळ) येथील टॉवर विरोधी शेतकरी समितीने टावरग्रस्त जमिनीचामोबदला मिळण्याकरिता नायब तहसील यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरें आहे काय,

(२) असल्यास, सन २०१० मध्ये भद्रावती ते परळी जाणारी उच्च दाबाची पावरग्रीड कंपनी अंतर्गत उंच मनोरे उभारण्यात आली असल्याने शेतीतील पिक नष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या टावरचे वय १०० वर्ष असल्यामुळे १०० वर्षापर्यंत त्या जमिनिवर कोणतेही पिक घेता येणार नसल्याने ब-याच शेतक-यांजवळ २ हेक्टरच्या आत शेतजमीन आहे. त्या पैकि १० ते १५ गुंठे जमीन नापीक झाल्यामुळे शेतक-यावर उपासमारीची वेळ आली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील टावरग्रस्त शेतक-यांना योग्य तो मोबदला देण्या करीता शासनाचे धोरण काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०४-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) अशत: खरे आहे.

(३) व (४) पिकांची उत्पादकता व पिकांचे भाव तालुका कृषी अधिकारी यांचेकडून प्राप्त करून घेऊन त्या आधारावर शेतक-यांना पिकांचे नुकसान भरपाई देण्यात आली आहे व शासन निर्णय दि १ नोव्हेंबर २०१० च्या निकषा नुसार शेतक-यांना टॉवरने व्याप्त जमिनीचा मोबदला देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) येथील जुना दत्तपुरह भूमीअभिलेख कार्यालयात रिक्त असलेली पदे भरण्याबाबत**

**(३६) ४७०११ (२१-०४-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगाव रेल्वे (जि.अमरावती) येथील जुना दत्तपुरह भूमीअभिलेख कार्यालयात अनेक पदे रिक्त असल्याने नागरिकांची गैरसोय होत असून येथे सिटीझन चार्टर केवळ नावाला उरला असून एकखिडकी योजना लागू करण्याची गरज निर्माण झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत व नागरीकांची गैरसोय दूर करण्यासाठी एक खिडकी योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०६-२०१६)** :(१), (२) व (३) उप अधीक्षक भूमी अभिलेख, धामणगांव (रेल्वे) या कार्यालयामध्ये एकूण १६ पदे मंजूर आहेत, त्यापैकी वर्ग-३ शिरस्तेदार-१, निमतानदार-१, प्रतिलिपी लिपीक-१ व छाननी लिनीक-१ अशी एकूण ४ पदे रिक्त आहेत.

वर्ष-२०१६ मध्ये होणाऱ्या नियतकालीक बदलीच्या वेळी उप अधीक्षक भूमी अभिलेख, धामणगांव (रेल्वे) कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही संकल्पीत आहे. तसेच सरळसेवा भरती अंतर्गत अमरावती विभागासाठी भूकरमापक/लिपीक-टंकलेखक यांची ३७ पदे भरण्याबाबतची प्रक्रिया सुरु आहे.

उप अधीक्षक भूमी अभिलेख, धामणगांव (रेल्वे) या कार्यालयात एक खिडकी योजना सध्या सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे महानगरप्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात बेकायदेशीर अनधिकृत बांधकामाचे दस्त नोंद न करणेबाबत**

**(३७) ४७१३७ (२०-०४-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरप्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात बेकायदेशीर/अनधिकृत बांधकामाचे दस्त नोंद करु नये असे आदेश .आयुक्त यांनी .नोंदणी महानिरीक्षक, पुणे यांना माहे जानेवारी, २०१६ वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयुक्त, पीएमआरडीए यांनी दिलेल्या आदेशानुसार .नोंदणी महानिरीक्षक, पुणे यांनी काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०८-०६-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक ३१/१२/२०१५ च्या पत्रान्वये आयुक्त, पुणे महानगरप्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण यांना याबाबतची कायदेशीर स्थिती सविस्तररित्या विशद करुन, बांधकाम नियमासंदर्भातील कायद्यामध्ये प्रतिबंधात्मक तरतूदी करण्याची आवश्यकता असल्याचे कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**१५ लाखांच्यावर लोखसंख्या असलेल्या महानगरातील तहसील कार्यालयाचे विभाजन करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३८) ४७४६८ (२०-०४-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) १५ लाखांच्यावर लोखसंख्या असलेल्या महानगरातील तहसील कार्यालयाचे विभाजन करण्याच्या अनेक वर्षापासून असलेल्या प्रस्तावावर शासनाकडून निर्णय घेण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास सदरहू प्रस्तावाची अंमल बजावणी किती दिवसात केली जाणार आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-०६-२०१६) :**(१), (२) व (३) राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात वाढलेली लोकसंख्या तसेच तेथील तहसिल कार्यालयातील कामकाजाचा वाढता व्याप विचारात घेवून महानगरपालिका अस्तित्वात असलेल्या तालुक्यांच्या तहसिल कार्यालयाचे बळकटीकरण करण्याच्या दृष्टीने त्या त्या तालुक्यांच्या क्षेत्रात स्वतंत्र अपर तहसिलदार यांचे कार्यालय स्थापन करण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सर्व विभागीय आयुक्त यांचे कडून मागविण्यात आला आहे. सर्व विभागीय आयुक्तांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर या संदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पट्टणकोडोली (ता.हातकंणगले, जि.कोल्हापूर) येथील शासकीय भूखंडात राजरोसपणे बेकायदेशीरपणे मुरुम उत्खनन सुरु असल्याबाबतत**

**(३९) ४८१०३ (२०-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पट्टणकोडोली (ता.हातकंणगले, जि.कोल्हापूर) येथील शासकीय भूखंडात राजरोसपणे बेकायदेशीरपणे मुरुम उत्खनन सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने आतापर्यंत किती जणांना अटक करुन त्याचेवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०७-२०१६) :**(१), (२) व (३) मौजे पट्टणकोडोली (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील गट नं.१२५५ मध्ये अंदाजे २०० ब्रास मुरुमाचे अवैध उत्खनन झाल्याचे आढळून आले असून, सदर प्रकरणी दि.९/५/२०१६ रोजी पोलिस स्टेशन हुपरी येथे एका अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वणी (जि.यवतमाळ) येथील दुय्यम निबंधक कार्यालयात नियम डावलून अपुऱ्या कागदपत्रांच्या आधारे खरेदी- विक्रीच्या व्यवहारांची नोंदणी केली जात असल्याबाबत**

**(४०) ४८१२१ (२०-०४-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि.यवतमाळ) येथील दुय्यम निबंधक कार्यालयात नियम डावलून अपुऱ्या कागदपत्रांच्या आधारे खरेदी- विक्रीच्या व्यवहारांची नोंदणी केली जात असल्याची धक्कादायक माहिती जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू व्यवहारांमुळे आदिवासी शेतकऱ्यांची फसवणूक होत असून याप्रकरणी संबंधित अधिकारी यांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे अनुषंगाने याप्रकरणी दोषी आढळलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१६-०६-२०१६) :**(१) होय अशा प्रकारची बातमी दि. १८.०१.२०१६ रोजी वर्तमानापत्रात प्रकाशीत झाली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) उक्त बातमीच्या अनुषंगाने तपासणी पथकाचीं नेमणुक करून दि ०१.१२.२०१५ ते दि. ३१.१२.२०१५ या कालावधीचे दस्ताची तपासणी केली आहे. तपासणीत तथ्य आढळून न आल्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) पश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हा येथील आमगाव गट ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या नविन लाडज या पुर्नवसीत गावाची ६० वर्षानंतरही महसुल विभागात नोंद नसल्याबाबत**

**(४१) ४८५३३ (२०-०४-२०१६). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हा येथील देसाईगंज तालुक्यातील आमगाव गट ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या नविन लाडज या पुर्नवसीत गावाची ६० वर्षानंतरही महसुल विभागात नोंद झालेली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसुल विभागात नोद करण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०४-०७-२०१६) :**(१), (२) व (३) गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज तालुक्यतील पुनर्वसित नविन लाडज हे गाव महसूली गाव म्हणून घोषित करण्याबाबतचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, देसाईगंज, जि.गडचिरोली यांनी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे दि.६.४.२०१६ च्या पत्रान्वये सादर केला आहे. सदर प्रस्तावाची छाननी करुन नवीन लाडज या गावांस महसूली गाव म्हणून घोषित करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्यास्तरावरुन करण्यात येत आहे.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील गावांना महसूली दर्जा मिळाला नसल्याबाबत**

**(४२) ४८५५४ (२०-०४-२०१६). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील कोपागुड, झाडेटोला, कुथेगाव, सीतटोला, शाहुनगर, हेटीटोला,काशीटोला, मातापोटी, घुसानटोला,भवरागड,गट्टेपायली,दराची, गट्टेपायली तुकूम, टवेटोला, गट्टानेली-मुंज्यालगोंदी, आमपायाटोला, बेलगावटोला, मोहलीटोला या गावांना महसुली दर्जा मिळाला नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावांना महसुली दर्जा व शासन दफ्तरी नोंद नसल्याने या गावांना शासनाची आर्थिक मदत मिळत नसल्याने मुलभुत सुविधांपासुन वंचीत राहावे लागत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या गावांची महसुली दर्जा शासन दफ्तरी नोद करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०४-०७-२०१६) :**(१), (२) व (३) प्रश्नात नमुद केलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील कुथेगांव, गट्टेपायली, तुकूम, दराची, मुंज्यालगोंदी व गट्टानेली या ६ गावांना यापूर्वीच महसूली गावांचा दर्जा देण्यात आला आहे. प्रश्नाधीन उर्वरित १३ टोले महसूली गावांचा दर्जा देण्यासाठी विहित करण्यात आलेले निकष पूर्ण करीत नसल्याने त्यांना महसूली गावांचा दर्जा देता आलेला नाही. मात्र सदर १३ टोले ही त्या त्या महसूली गावांचा भाग असल्याने त्यांना शासनाची आर्थिक मदत व अन्य सोयी-सुविधा मिळत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हा कार्यालय आणि निवासी संकुल उभारण्याबाबत**

**(४३) ४८७०४ (२०-०४-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा कार्यालय संकूल आणि निवासी संकुल उभारण्यासंदर्भात महसूल विभागाच्या प्रधान सचिवांनी विभागीय आयुक्त आणि पालघर जिल्हाधिकारी यांच्या संबंधिता समवेत माहे १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यादरम्यान प्रस्तावित नियोजित जागेची पाहणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) च्या संदर्भात नियोजन बैठकीत घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाचे स्वरुप व दळणवळणा संदर्भातील सुलभता राखण्यासाठी कोणत्या उपाययोजना आखण्यात आल्या आहेत, वा आखण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०७-२०१६) :**(१) होय.

(२) प्रधान सचिव (महसूल) यांनी पलघर जिल्हा मुख्यालयाच्या भेटी दरम्यान जिल्हास्तरीय अधिकारी यांची बैठक घेवून जिल्हास्तरावर स्थापित झालेली कार्यालये, स्थापन न झालेली कार्यालये व विविध संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची निर्माण झालेली पदे यांचा आढावा घेतला. पालघर, कोळगांव, मोरेकुरण, नंडोरे, दापोली, टेंभोडे व शिरगांव या गावांत सुमारे ४४० हे उपलब्ध शासकीय जमिनीवर नवनिर्मित पालघर जिल्हा मुख्यालय व पालघर नवनगर सिडकोमार्फत विकसित करण्याबाबत शासनाने ठरविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेवासा तालुक्यातील पक्षकारांन व वकीलांना उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात दाव्यांसंदर्भातील कामकाज महिन्यातील दोन दिवस नेवासा येथे चालविण्याबाबत**

**(४४) ४९१०६ (२०-०४-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा तालुक्यातील पक्षकारांन व वकीलांना उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात चालू असलेल्या दाव्यांसंदर्भात नगर येथे जावे लागत असल्याने त्यासाठी वेळ व पैसा मोठ्या प्रमाणात खर्च होतो याकरिता हे कामकाज महिन्यातील दोन दिवस नेवासा येथे चालविण्यात याव अशी मागणी वकील संघाने नुकतीच माहे डिसेंबर, २०१५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने सदर मागणीवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, सदर मागणीनुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०७-२०१६)** :(१), (२) व (३) नेवासा वकील संघाने अर्ध न्यायीक प्रकरणाचे सुनावणी कामाकज महीन्यातील दोन दिवस नेवासा येथे चालविण्याबाबत मागणीचे निवेदन फेब्रुवारी, २०१५ मध्ये उपविभागीय अधिकारी नगर भाग, अहमदनगर यांचेकडे केले होते. सदर मागणीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी नगर भाग, अहमदनगर यांनी माहे मार्च, २०१५ पासून नेवासा तालुक्यातील दाखल झालेल्या दाव्याच्या सुनावणीचे अर्धन्यायीक कामकाज दर महिन्यातील प्रत्येक शुक्रवारी तहसिल कार्यालय, नेवासा येथे सुरु केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात ३०८४ नवीन तलाठी सज्जे निर्माण करण्याबाबत**

**(४५) ५०४३७ (२१-०४-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विभागीय आयुक्त नागपूर यांचे अध्यक्षतेखाली निर्माण करण्यात आलेल्या तलाठी सज्जा पुनर्रचना समितीने माहे आक्टोंबर, २०१४ मध्ये राज्य शासनास सादर केलेला अहवाल शासनाकडे कार्यवाहीसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त समितीने राज्यात ३०८४ इतके नवीन तलाठी सज्जे निर्माण करण्याची राज्य शासनास शिफारस केलेली आहे , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तलाठ्यांच्या कामावारील पडणारा ताण लक्षात घेवून शासनाने समितीच्या शिफारशीनुसार लवकरात लवकर कार्यवाही करावी, अशी मागणी तलाठी संघटनेने शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी तलाठ्यांची पदे निर्माण करुन नवीन सज्जे निर्माण करण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०७-२०१६)** :(१), (२), (३) व (४) राज्यातील तलाठी साझा पुनर्रचनेसाठी शासनास व्यवहार्य व अभ्यासपूर्ण शिफारशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचे मंत्रिपरिषद बैठकीत सादरीकरण करण्यात आले होते. सदर समितीने सादर केलेल्या शिफारशींची मंत्रिपरिषदेने तत्वत: मान्यता दिली असून सदर अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील वसई परिमंडळाअंतर्गत महावितरण कंपनीस कर्मचाऱ्यांची पदे वाढवून मिळण्याबाबत

**(४६) ५१६८२ (२०-०४-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वसई परिमंडळाअंतर्गत महावितरण कंपनीस २००० कर्मचारी मंजूर असुन सध्या १५०० कर्मचारी असुन सुमारे ५०० कर्मचारी कमी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी कमी असणाऱ्या ५०० कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रीया सुरु करण्याची मागणी दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्‌वारे मा. ऊर्जा मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रीया सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०७-२०१६) :**(१) पूर्वीच्या वसई मंडळांतर्गत २०९९ मंजूर पदांपैकी ४२० पदे रिक्त आहेत.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१६ मध्ये भरती प्रक्रिया सुरु करण्याची मागणी केली आहे.

(३) व (४) महावितरण कंपनीकडून वर्ग-१ व वर्ग-२ मधील रिक्त पदे सरळसेवेने तसेच पदोन्नतीद्‌वारे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच वर्ग ३ व ४ च्या पदांची कामे कंत्राटी कामगारांमार्फत करुन घेण्यासाठी अधीक्षक अभियंता यांना कंपनीने प्राधिकृत केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील भूमिअभिलेख कार्यालयात विकत घेतलेल्या भूखंडची नोंद करण्यापासून ते वारसा नोंदी, मोजणी करुन हद्द निश्चित करण्याबाबत

**(४७) ५२३८२ (२०-०४-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भूमिअभिलेख कार्यालयात विकत घेतलेल्या भूखंडची नोंद करण्यापासून ते वारसा नोंदी, मोजणी करुन हद्द निश्चित करणे, नकला तयार करुणे यापासून ते अनेक कामांसाठी सर्वसामान्याना त्रास देण्याचा सर्रास प्रकार वाढले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागाच्या कोल्हापूर, पुणे, सोलापूर आणि सातारा जिल्ह्यात कर्मचा-यांना लाच घेतांना रंगेहाथ पकडल्याच्या माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील बिद्री (ता.कागल) येथील भूमि अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यास लाच घेतांना माहे ६ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या सुमारास अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने विभागातील गैरव्यवहार रोखण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (११-०७-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) सन जानेवारी, २०१२ पासून मोजणी विषयक कामात सुधारणा करण्यासाठी भूमि अभिलेख विभागामार्फत "ई-मोजणी" संगणकीय प्रणाली सुरु करण्यात आलेली असून, दिनांक २३.१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील अधिकार अभिलेखातील नोंदींचे संगणकीकरण करण्यासाठी ई-फेरफार व ऑनलाईन म्युटेशन कार्यक्रम सुरु करण्यात आलेला असल्यामुळे, सदर कामात पारदर्शकता आलेली आहे. तसेच विभागातील सर्व कर्मचाऱ्यांना जनतेची कामे विहित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तथापि, कोल्हापूर जिल्ह्यातील श्री.संजय मारुती कोंढवळे, परिरक्षण भुमापक, उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, सजा बिद्री ता.कागल, जि.कोल्हापूर ह्या "गट-क" च्या एका कर्मचाऱ्यास दिनांक ५.२.२०१६ रोजी व सांगली जिल्ह्यातील श्री.बापुराव पांडुरंग हुबाळे, परिरक्षण भुमापक, उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, वाळवा, जि.सांगली या कर्मचाऱ्यास दिनांक ७.१.२०१६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून लाच स्वीकारल्या प्रकरणी अटक करण्यात आली आहे. पुणे, सातारा व सोलापूर ह्या जिल्ह्यात जानेवारी, २०१६ ते फेब्रुवारी, २०१६ ह्या कालावधीत अशी घटना घडली नाही.

उक्त प्रकरणी उपसंचालक, भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांनी अनुक्रमे दिनांक २१.१.२०१६ व २०.२.२०१६ च्या आदेशान्वये श्री.हुबाळे व श्री. कोंढवळे यांना निलंबित केलेले असून त्यांच्याविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्याची कार्यवाही व शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव जिल्ह्यात केआरए अंतर्गत महसूल अधिकाऱ्यांकडे दाखल केलेली सुमारे १६५० प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(४८) ५२४९४ (२१-०४-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यात केआरए अंतर्गत महसूल अधिकाऱ्यांकडे दाखल केलेली सुमारे १६५० प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने जळगांव जिल्ह्यात प्रलंबित असलेले खटले निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०१-०७-२०१६)** :(१), (२) व (३) जळगाव जिल्ह्यात माहे जानेवारी, २०१६ अखेर सुमारे १६५० अर्धन्यायीक प्रकरणे प्रलंबित होती. सदर प्रकरणे ही अर्धन्यायिक स्वरुपाची असल्याने वादी व प्रतिवादी यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देवून आणि कायदा/नियमांमधील तरतूदींचा परामर्श घेऊन न्याय निर्णय देणे आवश्यक असते. माहे २०१६ अखेर प्रलंबित प्रकरणांपैकी २८८ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत. प्रलंबित असलेल्या एकूण १३६२ प्रकरणात विहीत प्रक्रिया पूर्ण करुन गुणवत्तेवर निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्ह्यातील वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना झालेल्या मारहाणी बाबत**

**(४९) ५२४९५ (२१-०४-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यातील वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना होणाऱ्या मारहाणी बाबत वीज वितरण समितीच्या कृती समितीने चाळीसगाव येथील तहसिल कार्यालयावर माहे जानेवारी, २०१६ मध्ये मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०७-२०१६)** :(१) हे अंशत: खरे आहे. विविध कामगार संघटनांच्या कृती समिती मार्फत माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये तहसिल कार्यालय, चाळीसगाव येथे मूकमोर्चा काढण्यात आला होता.
(२) व (३) महावितरण कंपनीने त्यांच्या मालमत्तेच्या झालेल्या नुकसानीबाबत स्थानिक पोलिस सटेशनमध्ये गुन्हा नोंदविलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कोटयावधी रुपयांचा सुरळीत वीज पुरवठा व्हावा यासाठी प्रत्येक गावाला लाईनमनची नियुक्ती करण्यात येणार असल्याबाबत**

**(५०) ५२५०३ (२०-०४-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोटयावधी रुपयांचा सुरळीत वीज पुरवठा व्हावा यासाठी प्रत्येक गावांला लाईनमनची नियुक्ती करण्यात येणार असल्याचा शासनाने निर्णय माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्या दरम्यान घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने निर्णयाची अंमलबजावणी कधीपासून करण्यात येणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०७-२०१६) :**(१), (२) व (३) प्रत्येक ग्रामपंचायतीकरीता एक विद्युत सेवक नेमण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.